**आयकरातील कलम 194C - कंत्राटी देयकांवरील उद्गम कर** - CA ओंकार कुलकर्णी (omkarskulkarni29@gmail.com) **(908)**

आपल्या देशात प्रत्यक्ष करप्रणाली मध्ये उद्गम कर, म्हणजेच TDS बद्दल आपण मागील एका लेखात सविस्तर चर्चा केली होती. ज्या विविध कलमांखाली उद्गम कर कपात करणे बंधनकारक आहे त्या कलमांपैकी कलम 194C या कलमाबद्दल आजच्या लेखात चर्चा करुयात. उद्गम कराचे नियम लागू होणारा बहुतेक प्रत्येक व्यवसाय हा कंत्राटी देयके देतच असतो. म्हणूनच कंत्राटी देयकांच्या बाबतीत लागू असणाऱ्या उद्गम करातील महत्त्वाच्या कलमांचे नियम पुढे पाहुयात.

- **कलम 194C कोणासाठी लागू होतो?:-**

कोणत्याही निर्दिष्ट व्यक्तिने कोणत्याही निवासी करदात्याला एखाद्या कंत्राटाखाली कोणतेही काम करण्यासाठी (कामगार पुरवण्याचे काम धरून) देयक रक्कम देताना कलम 194C खाली उद्गम कर म्हणून कापून घेऊन सरकारजमा करणे गरजेचे आहे.

यामध्ये खालील कामांसाठीचे कंत्राट समाविष्ट केले आहेत:-

1. जाहिरात करणे.
2. प्रसारण करणे किंवा प्रसारणांशी निगडित कार्यक्रमांची निर्मिती करणे.
3. रेल्वे सोडून इतर कोणत्याही प्रकारे वस्तू किंवा मनुष्य यांची वाहतूक करणे.
4. अन्न पुरवण्याचा व्यवसाय (Catering).
5. एखाद्या ग्राहकाच्या गरजांच्या किंवा निर्देशांच्या आधारावर एखाद्या वस्तुची निर्मिती किंवा पुरवठा करणे आणि त्यासाठी त्या ग्राहकाकडून किंवा कलम 40A(2) खाली नमूद केलेल्या त्याच्या सहयोग्यांकडून मालाची खरेदी करणे.

- **कलम 194C खाली उद्गम कर केव्हा कापायचा आहे?:-**

एखाद्या कंत्राटदाराला देयक रक्कम देताना किंवा ती रक्कम आपल्या व्यवसायाच्या पुस्तकांमध्ये त्या कंत्राटदाराच्या खात्यावर वर्ग करताना - यापैकी जी घटना आधी होईल त्या वेळेस आपल्याला त्यावरील उद्गम कर कपात करून घेणे गरजेचे आहे आणि त्यानुसार तो कर सरकारजमा करण्याची विहित वेळ ठरवणे गरजेचे आहे. उदा.: एका कंत्राटदाराने आपल्याला दि. 15/07/2023 चे त्याचे बिल दिले आणि आपण त्या तारखेला आपल्या व्यवसायाच्या पुस्तकांमध्ये, खतावणीत त्याच्या नावावर त्या बिलाची रक्कम जमा केली तर उद्गम कर दि. 15/07/2023 रोजी कापणे गरजेचे आहे आणि दि. 07/08/2023 पूर्वी तो सरकारजमा करणे गरजेचे आहे. या उदाहरणात आपण त्या कंत्राटदाराला त्या बिलाची रक्कम ऑगस्ट किंवा त्या पुढील कोणत्याही महिन्यात दिली तरीही उद्गम कर हा 07/08/2023 पूर्वीच भरावा लागणार आहे. याच उदाहरणात असे गृहीत धरुयात की आपण त्या कंत्राटदाराला वरील बिल मिळण्याआधी दि. 25/06/2023 रोजी काही रक्कम आगाऊ दिली आहे. तर या आगाऊ दिलेल्या रक्कमेवर आपल्याला उद्गम कर 25/06/2023 रोजीच कपात करून घेऊन दि. 07/07/2023 पूर्वी तो सरकारजमा करणे गरजेचे आहे.

- **कोणत्या दराने कलम 194C खाली उद्गम कर कपात करायची आहे?:-**

आपण ज्याला देयक रक्कम देत आहोत ती व्यक्ती निवासी वैयक्तिक करदाता असेल किंवा हिंदु अविभक्त कुटुंब (HUF) असेल तर आपल्याला 1% दराने कर कपात करावयाची आहे. वरील दोन प्रकारचे करदाते सोडून इतर कोणत्याही प्रकारच्या करदात्याला (उदा. - भागीदारी फर्म, कंपनी इ.) देयक रक्कम देताना 2% या दराने कर कपात करावयाची आहे. जर कर कपात करताना समोरील व्यक्तीने स्वतःचा PAN आपल्याला दिला नसेल तर कर कपात ही 20% या दराने करावी लागेल.

- **कोणत्या परिस्थितीत कलम 194C खाली कर कपात करायची नाही?:-**

1. जर एखाद्या कंत्राटाखाली कंत्राटदाराला द्यावयाची रक्कम ही रु. 30,000/- किंवा त्यापेक्षा कमी असल्यास 194C खाली कर कपातीची गरज नाही.
2. जर एखाद्या कंत्राटदाराला पूर्ण आर्थिक वर्षात दिल्या जाणाऱ्या अनेक रक्कमांची एकूण बेरीज ही रु. 1,00,000/- किंवा त्यापेक्षा कमी असल्यास कर कपातीची गरज नाही.
3. जर आपण एखादा खर्च व्यवसायासाठी न करता स्वतःच्या वैयक्तिक कारणाकरता करत असू तर अशा प्रकारच्या खर्चांवर कलम 194C खाली कर कपात करण्याची गरज नाही.
4. जर आपण एखाद्या माल वाहतूकदाराला माल वाहून नेण्यासाठी काही रक्कम देत असू आणि त्याच्याकडे स्वतःच्या मालकीच्या 10 किंवा त्यापेक्षा कमी माल-वाहतूकीच्या गाड्या असतील तर त्याला दिल्या जाणाऱ्या रक्कमेवर कलम 194C खाली कर कपात करण्याची गरज नाही. मात्र सदर माल-वाहतूकदाराने आपल्याला त्याच्या मालकीच्या गाड्यांच्या संख्येच्या बाबतीत घोषणापत्र देणे मात्र गरजेचे आहे. आणि त्याचा स्वतःचा PAN देणे देखील गरजेचे आहे.
5. वर नमूद केलेल्या 4 प्रकारच्या कामांच्या कंत्राटांमधील चौथ्या क्रमांकातील कंत्राटांच्या बाबतीत जर कंत्राटदाराने त्याच्या बिलामध्ये मालाची रक्कम वेगळी नमूद केली असेल तर सदर मालाच्या रक्कमेवर कर कपात करण्याची गरज नाही. मात्र मालाची रक्कम वेगळी नमूद केली नसल्यास, संपूर्ण बिलाच्या रक्कमेवर कर कपात करावी लागेल.

- **कलम 194 C खाली कपात करण्या संदर्भात काही महत्त्वाचे मुद्दे/ उदाहरणे:-**

1. कंत्राट हे केवळ लेखी स्वरूपातच असायला पाहिजे अशी अट या कलमामध्ये नाही. त्यामुळे मौखिक करार असलेल्या कंत्राटांच्या बाबतीत देखील कर कपात करावी लागते.
2. अनेकदा एखादी रक्कम कलम 194C खाली कर कपातीस पात्र धरायची की कलम 194I खाली पात्र धरायची अशी शंका येऊ शकते. उदा. एखाद्या सोने-चांदीच्या व्यापाऱ्याने एखाद्या प्रदर्शनासाठी स्टॉल बुक केला तर बहुतांशी बाबतीत सदर रक्कम ही त्याच्याकडून जागेच्या भाड्यापोटी घेतलेली असते आणि अशा रक्कमेवर कलम 194I खाली 10% दराने कर कपात करणे गरजेचे आहे. अनेक व्यापारी अशा देयकांवर कलम 194C खाली 1%/ 2% दराने कर कपात करतात. मात्र यावर अनेक खटल्यांत आयकर अधिकाऱ्यांनी आक्षेप घेतलेला दिसून येतो.
3. वर नमूद केलेल्या दोन कलामांमधील गोंधळाप्रमाणेच कलम 194C आणि कलम 194J यांच्यात देखील अनेकदा गोंधळ होतो. व्यावसायिक किंवा तांत्रिक (Professional or Technical) स्वरूपाच्या सेवांसाठी दिल्या जाणाऱ्या देयकांवर कलम 194J खाली 10% एवढ्या दराने कर कपात करावी लागते. मात्र अशा प्रकारच्या देयक रक्कमांच्या बाबतीत केवळ एखादा करार केलेला आहे म्हणून कलम 194C खाली कर कपात करणे अयोग्य आहे.
4. वर्तमानपत्रांमध्ये दिलेल्या जाहिरातींच्या बाबतीत वर नमूद केलेल्या रु. 30,000/- / रु. 1,00,000/- च्या मर्यादा तपासून घेऊन कलम 194C खाली कर कपात करणे गरजेचे आहे.
5. एखाद्या खर्चाच्या बाबतीत कलम 194C खाली दिलेल्या रु. 30,000/- / रु. 1,00,000/- च्या मर्यादांचे उल्लंघन होईल की की नाही हे आपल्याला आर्थिक वर्ष सुरु होतानाच अंदाजाने ठरवून घ्यावे लागेल आणि खर्चाच्या पहिल्या रुपायासूनच कर कपात सुरु करावी लागेल. अनेक व्यापाऱ्यांचा हा गैरसमज आहे की वरील मर्यादांचे उल्लंघन झाल्यानंतर कर कपात सुरु करायची आहे. मात्र आयकर खात्याला तसे अपेक्षित नाही याची नोंद घ्यावी.
6. जर कर कपात करण्यास पात्र असलेल्या खर्चाच्या बाबतीत कर कपात केली गेली नाही तर सदर खर्चापैकी 30% खर्च हा उत्पन्नातून वजावट म्हणून मिळत नाही.

अशा या महत्त्वपूर्ण कलमांचा योग्य अभ्यास करून व त्या संबंधी लागू होणाऱ्या नियमांचे पालन करून प्रत्येक व्यावसायिकाने संबंधीत देयके अदा करावीत.